महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

===========================================================================

जावक क्रमांक – ७१३/२७ दिनांक :- २७ फेब्रुवारी, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडामध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

मुंबई, दि. २७ फेब्रुवारी, २०२५ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) मुख्यालयात ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांची जयंती आज मराठी भाषा गौरव दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त म्हाडातील अधिकारी-कर्मचारी यांच्यासाठी 'कार्यालयीन कामकाज' या विषयावर विशेष कार्यशाळा घेण्यात आली.

वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात झालेल्या या कार्यशाळेत महाराष्ट्र शासन सेवेतून उपसचिव पदावरून निवृत्त झालेले श्री. वसंत चौधरी यांनी मार्गदर्शन केले.

म्हाडातील अधिकारी-कर्मचारी यांना दैनंदिन कार्यालयीन कामकाज करताना उपयोग व्हावा, मराठी भाषेचा कामकाजात अधिकाधिक वापर व्हावा, हे या कार्यशाळेचे उद्दिष्ट होते. या कार्यशाळेत नस्ती/धारिका तयार करणे, प्रशासनिक लेखन, कार्यालयीन टिप्पणी लेखन, पत्रलेखन, सहा गठ्ठे पद्धती, अभिलेख वर्गीकरण याबाबत श्री. चौधरी यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी म्हाडाच्या मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, म्हाडाचे जनसंपर्क अधिकारी तथा मराठी भाषा अधिकारी श्री. हेमंत पाटील, उपमुख्य अधिकारी श्री योगेश देशमुख, लेखाधिकारी श्री. सुनील इंगवले, मिळकत व्यवस्थापक श्री. संजय माने आदींसह म्हाडातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

#######

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

---

